# माध्यमिक स्तरावरील इंग्रजी विषयाचे संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी कृती कार्यक्रम राबवून त्याची परिणामकारकता अभ्यासणे.

संशोधक
प्रा. डॉ. कु.अंजली अनिल अंजनकर

**सारांश**

*भाषा म्हणजे संपूर्ण मानवजातीला मिळालेले सर्वश्रेष्ठ वरदान आहे. भाषेचा जन्म मानवाच्या सहजप्रवृत्तीतून झाला. आपल्या विचारांचे वहन करण्याचे साधन म्हणजे भाषा होय. आपल्या भावना प्रकट करण्यासाठी विचारांची आवश्यकता असते. स्वतःचे विचार स्पष्टपणे, नेमकेपणे व प्रभावीपणे मांडता येणे ही व्यक्तिमत्व विकासातील एक महत्त्वाची बाब आहे. ज्ञान, विचार व संकल्पना यांच्या समजुतीसाठी व देवाण-घेवाणीसाठी भाषेवर प्रभुत्व संपादन करणे व्यक्तिमत्व विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे.*

*भारतीय शिक्षण प्रणालीत मराठी माध्यमांच्या शाळेत इंग्रजी भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकवली जाते. Oxford Dictionary नुसार English शब्दाचा अर्थ "English is the language of England use in varities throughout the words of world." म्हणजे इंग्रजी भाषा ही इंग्लंडची भाषा आहे. ती शब्दांमधून वेगवेगळ्या तन्हेने वापरली जाते. इ.स. २००० पूर्वी तर इयत्ता ५ वी पासून इंग्रजी भाषा ही तृतीय भाषा म्हणून अभ्यासक्रमात समाविष्ट होती. इंग्रजी भाषेचे महत्त्व लक्षात घेवून सरकारने इ.स. २००० पासून इंग्रजी हा विषय इयत्ता १ ली पासून अनिवार्य केला आहे. यापूर्वी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्रजीची ओळख उशिरा होत असे. तसेच ही परकीय भाषा असल्यामुळे त्यांना कठिण वाटत असे.*

*इंग्रजी तृतीय भाषा विषयाच्या तोंडी परीक्षेदरम्यान विद्यार्थी संभाषण कौशल्यात कमी पडतात. इंग्रजी भाषेत संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी त्याचा सराव करणे सरावासाठी कृतिकार्यक्रम शालेय स्तरावर राबविणे अतिशय उपयुक्त आहे. वाक्याचे इंग्रजी भाषेतील प्रकार आपण अर्थानुसार समजून घेतले तरीही इंग्रजीतल्या उच्चारशास्त्र म्हणजे Efficiency Level मध्ये अधिक पुढे जाण्याकरिता संभाषचा सराव महत्त्वाचा आहे. बोलता येणे फक्त महत्त्वाचे नसून अधिकाधिक प्रभावीपणे बोलता येणे खरोखरच आवश्यक आहे.*

***मुख्य शब्द :*** *इंग्रजी विषयाचे संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी कृती कार्यक्रम*

**संशोधन निबंधाचे शीर्षक**

माध्यमिक स्तरावरील इंग्रजी विषयाचे संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी कृती कार्यक्रम राबवून त्याची परिणामकारकता अभ्यासणे .

**संशोधन निबंधाचे उद्दिष्ट्ये**

i. इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाचा आढावा घेणे.
ii. इंग्रजी विषयाच्या संभाषण कौशल्याचा आढावा घेणे.
iii. विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाचे संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी कृतिकार्यक्रम राबविणे.
iv.विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाचे संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी राबविलेल्या कृतिकार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**परिकल्पना:**

१.इंग्रजी विषयातील संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी कृतिकार्यक्रमाच्या माध्यमातून केलेले अध्यापन अधिक परिणामकारक ठरते.

**संशोधन पध्दती निवड**

प्रस्तुत संशोधन हे भविष्यकाळाशी संबंधित असल्यामुळे प्रायोगिक पद्धतीचा उपयोग केला होता.

**न्यादर्श निवड:-**

प्रस्तुत संशोधनासाठी सुगम याद्दच्छिक पद्धतीने नमुना म्हणून मराठी माध्यमाच्या शाळेतील ५० + ५० = १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन साधनांची निवड:-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगिक पद्धतीचा अवलंब केला गेला असल्याने संशोधकाने विद्यार्थ्यांकरिता चाचणी तर इंग्रजी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी प्रश्नावलीचा वापर करण्यात आला.

**निष्कर्ष**

१. नियंत्रित गट व प्रायोगिक गटाने इंग्रजी संभाषण कौशल्याचे परंपरागत पद्धतीने अध्यापन केलेले अध्यापन व क्रमपाठ विकसित करून केलेले अध्यापन यांच्या अध्ययन निष्पत्तीमध्ये ०.०५ सार्थकता स्तर सार्थक फरक आढळून आला.

२. कृतिकार्यक्रमाद्वारे अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी संभाषण शिकण्याबद्दल आवड निर्माण होते हे ०.०५ सार्थकता स्तरावर लक्षणीय आढळून आले.

३. विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषणात आवड निर्माण होण्यासाठी टप्याटप्याने म्हणजे कृतिकार्यक्रम विकसित करून अध्यापन केल्यास त्यांना संभाषणात आणखी आवड निर्माण होऊ शकते हे ०.०५ सार्थकता स्तरावर लक्षणिय आढळून आले.

४. इंग्रजी संभाषण विकसित करण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धा, खेळांचे आयोजन करतांना शिक्षक संशोधनाअती आढळले.

५.इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी वेगवेगळ्या कृतींचा, पद्धतींचा, शैक्षणिक साहित्याचा वापर शिक्षकांकडून होतो हे संशोधनाअंती आढळले.

६. विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संभाषणात सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते हे दिसून आले.

७.विद्यार्थ्यांचे उच्चार शुद्ध व स्पष्ट होण्यासाठी शिक्षकांकडून प्रयत्न केले जातात हे संशोधनाअंती आढळले.

८.इंग्रजी संभाषण विकासासाठी शिक्षकांकडून जास्त तासिका उपलब्ध करून दिल्या जातात हे संशोधनाअंती आढळले.

**शिफारशी**

1. पुढील पिढीला जर आपले पूर्वज्ञान जागृत ठेवण्यासाठी प्रेरीत करावयाचे असेल तर त्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची, संभाषणाची माहिती व ज्ञान देण्याची गरज आहे.
2. इंग्रजी संभाषण विकासासाठी व आवड निर्माण करण्यासाठी शाळेत वेगवेगळे चर्चासत्र, परिसंवाद, व्याख्याने, स्पर्धांचे आयोजन करावे.
3. शिक्षकांनी कृतिकार्यक्रमाचा वापर करून शिकविण्याचा प्रयत्न करावा.
4. इंग्रजी विषय शिक्षकांना कृतिकार्यक्रम विकसित करून अध्यापन कसे करावे याचे प्रशिक्षण देण्यात यावे.
5. इंग्रजी संभाषण कौशल्य विकासासाठी इंग्रजी मंडळाची स्थापनाकरून त्याद्वरे तंत्रज्ञानाशी संबंधित दृक-श्राव्य साधनांची निर्मिती करावी.
6. इंग्रजी संभाषण कौशल्य विकासासाठी व जागृतीसाठी पालक मेळाव्यांचे आयोजन करून त्यांच्या समस्यांचे निराकरण करून विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी विषयाचे महत्त्व पटवून देण्यात यावे.
7. शासनाने इंग्रजी संभाषण कौशल्य विकासासाठी प्रत्यक्ष अनुभव देण्याकरिता प्रत्येक शाळेला कमी दराने इंग्रजी भाषा प्रयोगशाळा निर्मितीसाठी शासनामार्फत प्राधान्याने आवश्यक साहित्य सुविधा पुरवाव्यात.

**संदर्भ सूची.**

i. कुंडले म. बा. (१९९०), "मराठीचे अध्यापन", पुणे, विद्या प्रकाशन, पृ.क्र. ९, १०.
ii. दुनाखे अरविंद (२००६), "प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान", पुणे, नूतन प्रकाशन, पृ.क्र. १०, ११, १२, २३५.
iii. आगलावे प्रदिप (२०००), "संशोधन पद्धतीशास्र व तंत्रे", नागपूर, विद्या प्रकाशन, पृ.क्र. २३७,
iv. घोरमोडे के. यु., घोरमोडे कला (२००७), "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे", नागपूर, विद्या प्रकाशन, पृ.क्र. ४११.

v. पाटील भा. वा. (२००६), "संशोधन पद्धती", पुणे, प्रशांत पब्लिकेशन्स, पृ.क्र. १६, १७, ११४, ११६, ११७, १२१, १९८, २२९, २३०.
vi. पंडित बन्सी बिहारी (२००७), "शिक्षणातील संशोधन", पुणे, नूतन प्रकाशन, पृ.क्र. १०, २१, ४०, १५९.
vii. भिंताडे वि. रा. (२००७), "शैक्षणिक संशोधन पद्धती", पुणे, नुतन प्रकाशन, पृ.क्र. १३३, १३४, १४४, १५९, ८१, ८४, ८७, ९०, ९८.